# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/०९/१७
## दि.१६/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ४३०/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हे.ॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | हर्षद जोशी,वय-५९,रा.पिसोळी गांव,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | अर्जुन महादाराम देवासी,वय-३२,रा.मयुर कॉलनी,कोथरूड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/१७ रोजी सकाळी १८/३० वा. मुंबई-बेंगलोर हायवे रोडने बावधन येथील रामनदी कॉलनीचे गेट समोरर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा पुतण्या कुंदन बाबुलाल जोशी,वय-६१,रा.रा.साई अंगन सोसा.आंबेगाव पठार,कात्रज,पुणे मोपेडवरून जात असताना,यातील नमुद इसम अर्जुन महादाराम देवासी याचे त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने व अविचाराने चालवित रोडचे चुकीचे दिशेने येवुन,कुंदन यांचे मोपेडला धडक देवुन,त्यांना गंभीररित्या जखमी करून त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. धुमाळ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७४६/१७,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | गोलुकुमार पांडे,वय-२१ वर्ष,रा.आदर्शनगर,वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | १.नाजीम मजीर शेख,वय-२४ वर्ष,रा.स.नं.१२,लक्ष्मीनगर येरवडा,पुणे २. रियाज आयुब खान, वय-३० वर्ष,रा.४६८,सेंटर स्ट्रिट कॅम्प,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०१७ रोजी पहाटे ०१/०० वा.बिशप स्कुल रामवाडी,पुणे समोरील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र पटनाईक बाबु, देबु, बाठिया या साथीदारांसह हॉटेल मधील मजुरीचे काम संपवुन त्यांचे राहते खोलीवर जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी व त्यांचे साक्षीदार यांना तुम्हा गांजा बेचते हो क्या असे म्हणुन त्यांची झडती घेवुन त्यांचे खिशातील रोख १ हजार ४०० रू रोख व मोबाईल असा एकुण ६,४००/- रू किचा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन चोरून नेले. (फिर्यादी यांनी दिलेल्या दिलेल्या मोटार सायकलचे नंबरवरुन नमुद इसमांना पकडलेले आहे. त्यांचेकडुन एकुण रोख,मोबाईल ६,४००/- रु असा ऐवज हस्तगत केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कुताळ ९८२३१९३९५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३७८/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | गणेश कांगुणे,वय-४२,रा.शुक्रवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०९/१७ रोजी १९/३० ते दि.१५/०९/१७ रोजी सकाळी ०८/३० वा.चे दरम्यान शुक्रवार पेठ,पुणे येथील झुनका भाकर केंद्र हॉटेल मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे शुक्रवार पेठ,पुणे येथील झुनका भाकर केंद्र हॉटेलचा दरवाजा चुकुन उघडा राहिला असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे हॉटेलचे उघडया दवाजाचे वाटे आंत प्रवेश करून,हॉटेल मधील काऊंटरचे ड्रॉवरचे कुलुप तोडुन त्यामधील ४,५०,०००/- रु रोख रक्कम चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. केसरकर ९९२३४७०५९९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २९५/१७,भादविक ३१८ |
| **फिर्यादी** | अशोक रायकर,वय-३८,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती किंवा महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०९/१७ रोजी ०५/०० वा. समृध्दी प्राईड धायरी,सिंहगड,पुणे येथील असलेल्या डक मध्ये |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात महिलेने अनैतिक संबंधातुन किंवा संबंधातुन एक स्त्री जातीचे अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,नमुद ठिकाणी मृत अवस्थेत टाकुन दिलेले मिळुन आले आहे, म्हणुन सदर अज्ञात व्यक्ती किंवा महिले विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कोळपे ९८२३३८२२७० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३७३/१७,भादविक ३६५,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३१,रा.चाळीसगांव,जि.जळगांव |
| **आरोपी** | १.संजय रामदास जगताप,वय-३६,रा.गांगर्डे नगर,पिंपळे-गुरव,पुणे (अटक) २.राजेंद्र बाबा साहेब रणदिवे,वय-४०,रा.कर्जत,अहमदनगर ३.एक महिला,रा.गांगर्डेनगर,पिंपळे-गुरव,पुणे ४. राजु खेमा राठोड,रा.औरंगाबाद ५.भिमदेव नामदेव चव्हाण,रा.सदर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०८/१७ रोजी ११/०० वा. ते दि.१६/०९/१७ रोजी १३/०० वा.चे दरम्यान स.नं.५१/१/४,गांगर्डेनगर,पिंपळे-गुरव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना पैशाचे व्यवहारावरून त्यांचे अपहरण करून,त्यांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देवुन डांबुन ठेवले आहे. (फिर्यादी यांची पोलीसांनी घटनास्थळी जावुन सुटका केली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. केंद्रे ८८८८९९३३९९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५४७/१७,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अस्लम मुलाणी,वय-२३ वर्षे,रा.डांगे चौक वाकड,पुणे |
| **आरोपी** | पशुपती फायनान्स आणि लेझीग कंपनी जयपुरचे एम.डी.- रोजद्र शर्मा व संबंधीत महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०८/२०१७ ते दि.२९/०८/२०१७ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील पशुपती फायनान्स आणि लेझीग कंपनी जयपुरचे एम.डी.-रोजद्र शर्मा व संबंधीत महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना ४ लाख रूपयेचे कर्ज मंजुर करून देण्याचे बहाण्याने वेळोवेळी त्यांचे मोबाईलवरुन मेसेज व फोन करुन सदर कर्जाचे प्रोसेसिंग करीता एकुण १,६३,०००/- रुपये त्यांचे बँकेचे खात्यावर भरण्यास सांगुन,फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज न देता त्यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.आर.स्वामी ९८६०१४७०९५ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ५३६/१७,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | राजेश पार्टे,वय-४३ वर्षे,रा.मोरे वस्ती,चिखली,पुणे |
| **आरोपी** | मोबाईलवरील तीन अज्ञात इसम व महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०१७ रोजी ते दि.०७/०९/२०१७ रोजीचे दरम्यान फिर्यादी हे काम करीत असलेले मोरवाडी पिंपरी पुणे येथील ऑफीस मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे |

**तपशिल** यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचेकडील दोन्ही बॅंकेचे क्रेडीट कार्ड,आधार कार्ड,तीन महिन्यांची पगार स्लीप,पॅन कार्ड creditcard0888gmail.com या ई-मेल आयडीवरुन प्राप्त करून,फिर्यादी यांना त्यांचे बॅंकचे एटीम कार्ड बंद होत आहे. यासंदर्भाने संपर्क करुन, त्यांचा विश्वास संपादन करून,त्यांचे मोबाईलवर येणारे ओटीपी नंबर विचारुन,फिर्यादी यांचे क्रेडीट कार्डाचे नंबरवरुन संगनमताने एकुण ३४,४९८/- रुपयांचे खरेदी व्यवहार करुन फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. सुर्यवंशी ९४२२९३९०७७

८

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे ९१२/१७,भादविक ४०६,४२०,१२०(ब),३४

**फिर्यादी** नागेश तोडकर,वय-३३,रा.पद्मावती,पुणे

**आरोपी** १.एक महिला,वय-३६,रा.शिरुर,जि.पुणे २.प्रविण सुमेरमलजी रांका,वय-४३,रा.सदर ३.संतोष नेमीचंद पटवा,रा.शिरुर,जि.पुणे ४.एक महिला,रा.वाळकी,ता.दौंड,जि.पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२५/११/२०१३ रोजीपासुन ते आजपावेतो मेगा सेंटर,मगरपट्टा चौक,सोलापुर रोड,हडपसर पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे ए.यु.स्मॉल फायनान्स बॅंक लिमी.मेगा सेंटर,हडपसर,पुणे याठिकाणी कर्ज वसुली या पदावर कार्यरत आहेत. यातील इसम व महिलांनी आपसात संगनत करून फिर्यादी यांचे फायनान्स कंपनीकडे मिळकत तारण ठेवुन १०,००,०००/- रुपये व्यावसायिक कर्ज घेतलेले असतानादेखील,सदर इसम व महिला यांनी घेतलेल्या कर्जाची कोणत्याही प्रकारची परतफेड न करता,अगर संबधित बॅंकेची कोणतीही अधिकृत संमती न घेता,सदर फायनान्स कंपनीकडे तारण ठेवलेली मिळकत परस्पर अ.क्र.४ या महिलेस विकुन,फिर्यादी यांचे फायनान्स कंपनीची अर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. व्ही.के.झंजाड ८८८८८ ६९९७५

९

**पो.स्टे.गुरनं./कलम** मुंढवा पो स्टे २६४/१७,भादविक ४२०,३४

**फिर्यादी** मल्लीनाथ मुलगे,वय-३६ वर्षे,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे

**आरोपी** १.समीर व इतर दोन महिला मोबाईलधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०७/२०१७ रोजीपासुन ते दि.०५/०८/२०१७ रोजीपर्यंत साई गोल्ड,श्रीकृपा सोसायटी, केशवनगर,मुंढवा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे मोबाईल क्रंमांकावर पर्सनल व होमलोन संदर्भात मेसेज आल्याने, फिर्यादी यांनी नमुद इसम व महिला मोबाईल धारकांना फोन करुन १० लाखाचे कर्ज पाहिजे असे सांगितले असताना,त्यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना कर्जासाठी रजिस्टेशन फी म्हणुन ३,५००/- रुपये,अग्रिमेंन्टसाठी २०,५००/- रुपये,इन्शुरन्ससाठी ४५,०००/- रूपये व ऑनलाईन प्रोसेसिंगसाठी ६५,०००/- रुपये असे सर्व मिळुन एकुण १,३४,०००/- रूपये भरावे लागतील असे फिर्यादी यांना सांगुन त्यांचेकडुन एकुण १,३४,०००/- रूपये घेवुन,फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज न देता त्यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे), एम.के.जगताप ९५९४९१७८८१

१०

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे ४७१/१७,भादविक ३५३,५०४,५०६,४२७

**फिर्यादी** पो.शि.नानगुडे, वानवडी पो स्टे पुणे शहर

**आरोपी** युवराज रामचंद्र अरबळकर,वय-२५,रा.वाडकर मळा,हडपसर,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०९/१७ रोजी रात्रौ ००/३० वा. कंजारभट वस्ती व महंमदवाडी पोलीस चौकी येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महंमदवाडी पोलीस चौकीचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना यातील नमुद इसम हे संशईतरित्या व दारुच्या नशेत मिळुन आल्याने त्यांचेकडे चौकशीसाठी ताब्यात घेत असताना ते पळुन जावु लागल्याने,फिर्यादी यांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सदर इसमांनी फिर्यादी यांचेवर हल्ला करुन त्यांना हाताने माहराण केली. तेंव्हा फिर्यादी यांनी त्यांना पोलीस चौकीमध्ये घेवुन येत असताना त्यांनी फिर्यादीस हाताने मारहाण करुन,महमदवाडी चौकीतील साहित्याची तोडफोड करुन नुकसान करुन,चौकीचे पत्र्यावर धडका देवुन,मी जीव देतो,तुम्हाला कामाला लावतो अशी धमकी देऊन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. पोतदार ८८८८८४३८९६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**